महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH200SSGC153645

मासं/शिनि-४/२०२६/५५५५
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
E-mail : dccellmahadiscom@gmail.com
Website : www.mahadiscom.in
दूरध्वनी क्र. : ०२२-२६४७४२११

**दिनांक : १३.०२.२०२६**

# परिपत्रक

**विषय:-** म.रा.वि.वि.कं. मर्या., कर्मचारी सेवाविनियम -२००५ चे सेवाविनियम क्र. ४६ मधील तरतुदीनुसार संपामध्ये सहभागी झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रकरणी सेवेतील खंड (Break in Service) बाबत सविस्तर सूचना प्रसारीत करणेबाबत.

--------

प्रशासकीय परिपत्रक क्र. १०५ दि. १०/०५/२००७ अन्वये आंदोलन, मोर्चा, धरणे, संप इत्यादी मध्ये सहभागी झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचा विनापरवानगी कार्यालयीन अनुपस्थितीचा कालावधी हा निवृत्ती लाभासहीत इतर सर्व कारणांकरीता महावितरणच्या सेवेत खंड (Break in Service) पडल्याचे ग्राहय धरण्याबाबतच्या सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच परिपत्रक क्र. औसंवि/अ/१०५९० दि. ०५/०४/२०११, म.रा.वि.वि.कं. मर्या. कर्मचारी सेवाविनियम -२००५ चे सेवाविनियम क्र. ४६ शी संलग्नित सुधारपत्र क्र. १५ दि. २७/०५/२०११ तसेच सुधारपत्र क्र. ५२ दि. १८/०२/२०२२ अन्वये (Break in Service) 'सेवेत खंड' याबाबत यापूर्वी उल्लेख केलेला आहे. तथापि, सदर तरतुदींच्या अंमलबजावणी करीता विविध प्रकरणी अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत सविस्तर व स्पष्ट सूचना क्षेत्रीय कार्यालयांपर्यंत प्रसारीत करणेबाबतची बाब व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती. याअनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजूरीनुसार खालीलप्रमाणे सूचना प्रसारित करण्यात येत आहेत.

२. एखादा अधिकारी / कर्मचारी जेव्हा 'विविक्षित अत्यावश्यक सेवा अधिनियम' (MESMA) लागू असताना संपामध्ये सहभागी झाल्यास त्याचा कार्यालयीन अनुपस्थितीचा कालावधी हा सेवेत खंड (Break in Service) पडल्याचे समजले जाईल. याबाबत विविध कायदे व विनियमांमध्ये उल्लेखल्यानुसार अधिकारी / कर्मचारी यांचे सेवेतील तसेच निवृत्ती व इतर अनुषंगिक लाभांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**अ) वेतननिश्चिती:-**

i) अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन स्थानापन्न पदाच्या / प्रत्यक्ष धारण केलेल्या पदाच्या समय श्रेणीतील किमान वेतनावर (मूळ / पहिला टप्पा) निश्चित करण्यात येईल.

ii) उच्च वेतनश्रेणी लाभ - सेवेतील खंडापूर्वी मंजूर करण्यात आलेला / लागू असलेला उच्च वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल व अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन त्यांनी प्रत्यक्ष धारण केलेल्या पदाच्या समय श्रेणीतील किमान वेतनावर (मूळ / पहिला टप्पा) निश्चित करण्यात येईल.

**ब) सेवालाभ:-**

i) पदोन्नती - अधिकारी / कर्मचारी यांचे नोकरीतील सातत्य भंग झाल्याचे समजण्यात येईल. परिणामी संपापूर्वीची सेवा पदोन्नतीसाठी विहीत केलेल्या अनुभवाकरीता ग्राह्य धरली जाणार नाही.

**उदा.** महावितरणमध्ये प्रत्येक वरिष्ठ पदावर पदोन्नतीकरीता किमान २/३ वर्षे त्या लगतच्या पदाचा अनुभव असणे विहित करण्यात आले आहे. संपामध्ये सहभागी असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची संपापूर्वीची सेवा पदोन्नतीसाठीच्या विहित अनुभवाकरीता ग्राह्य धरली जाणार नाही. सबब सदर निकषांप्रमाणे अनुभवाची गणना ही संबंधित अधिकारी / कर्मचारी संपपश्चात पुनश्च: सेवेत रुजू झाल्यानंतर करण्यात येईल व अनुभवाचा निकष पूर्ण केल्यानंतरच ते पदोन्नती करीता पात्र ठरतील.

ii) उच्च वेतन श्रेणी लाभ - पदोन्नतीकरीता सर्वार्थाने पात्र असून देखील केवळ रिक्त पदे / अनुशेष उपलब्ध नसल्याने सेवा कालावधी दरम्यान होणारी कुंठीतता दूर करण्यासाठी विहित सेवा कालावधी पूर्ण केल्यानंतर अधिकारी / कर्मचारी यांना उच्च वेतन श्रेणींचे लाभ अनुज्ञेय करण्याची तरतूद विषद करण्यात आलेली आहे. तथापि 'विविक्षित अत्यावश्यक सेवा अधिनियम' (MESMA) लागू असताना संपात सहभागी झाल्यास अधिकारी / कर्मचारी यांचे सेवेतील सातत्य खंडीत झाल्याचे समजण्यात येईल. त्यामुळे उच्चवेतनश्रेणीचे लाभ लागू करण्याकरीता आवश्यक असलेला विहित ६/९/२८ वर्षांच्या कालावधीची गणना ही संप पश्चात पुन:श्च रुजू झालेल्या दिनांकापासून करण्यात येईल. त्यामुळे संपात सहभागी झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे बाबतची उच्च वेतन श्रेणी लाभाची प्रकरणे लांबणीवर पडतील.

क) **सेवापूर्ती लाभ:-**

अंतिम उपदान - संपामधे सहभागी झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडून घडलेल्या अनुचित कृत्यामुळे कंपनीच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे सिध्द झाल्यास सदर प्रकरणी विभागीय शिस्तभंग कारवाई पूर्णत्वास झाल्यानंतर सक्षम अधिकारी यांचेकडून अशा अधिकाऱ्याचे / कर्मचाऱ्याचे उपदान पूर्णत: / अंशत: जप्त करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतील. त्याअनुषंगाने संबंधित वेतन आहरण व वितरण अधिकारी (Disbursing Authority) उपदान जप्त करणे बाबत आदेश निर्गमित करतील.

३. विविध कायदे तसेच राजपत्रामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अत्यावश्यक सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना शासनाद्वारे 'विविक्षित अत्यावश्यक सेवा अधिनियम' (MESMA) कायदयाबाबतचा आदेश निर्गमित झाल्यानंतर विहित मुदतीत संपावर जाता येणार नाही. सदर कालावधीत कोणतीही व्यक्ती सामुहिकरित्या / थेटपणे संपावर गेल्यास, काम बंद आंदोलन केल्यास, काम हळू करण्याचा प्रयत्न करून उत्पादन क्षमतेवर परिणाम करण्याचा प्रयत्न केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यासोबतच विभागीय शिस्तभंग कारवाई करण्याची तरतूद विहित करण्यात आली आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे.

i) संपावर जाण्यासाठी अधिकारी कर्मचारी यांना उद्युक्त करणे, कामावर हजर होण्यासाठी इच्छुक असणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोखणे अशी कृत्ये करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरोधात प्रकरण परत्वे फौजदारी गुन्हा दाखल करणे.

ii) उपरोक्त नमूद कालावधीमध्ये अनधिकृत अनुपस्थिती दर्शविणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध गंभीर गैरवर्तनाअंतर्गत सेवेतून काढून टाकणेसारखी कठोरतम शिस्तभंग कारवाई करणे. तसेच अधिकारी कर्मचारी यांचे संप काळातील वर्तन पहाता प्रकरण परत्वे सेवा उपदान अंशत: अथवा पूर्णत: जप्त करणे. त्याअनुषंगाने संबंधित वेतन आहरण व वितरण अधिकारी (Disbursing Authority) यांचे स्तरावरून उपदान जप्त करणे बाबत आदेश निर्गमित होणे.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(राजेंद्र पवार)**
**संचालक (मा.सं.)**

**प्रत सस्नेह रवाना:-**

संचालक (वित्त) /(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:-**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर / कल्याण.

२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे / नागपूर.

३) कार्यकारी संचालक (वित्त) / (वितरण) / (पायाभूत आराखडा) / (विशेष प्रकल्प)/ (वाणिज्य) / (सुवअं) /(मा.सं.) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

४) मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) / (तां/आ) / (सांघिक वित्त) / (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी सल्लागार / (कंपनी सचिव), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

५) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु), म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.

६) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडळ, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

७) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., परिमंडळ कार्यालय (सर्व).

८) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी / मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

९) महाव्यवस्थापक (मा.सं)/ (मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

१०) मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.